# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात कोरोना रुग्णालयात ऑक्सिजन पुरवठा खर्चात दुप्पटीने झालेली वाढ

**(१) १३२४३ (१४-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना रुग्णाचे प्रमाण वाढत असून अतिदक्षता विभागात दाखल केल्या जाणाऱ्या रुग्णास ऑक्सिजनची गरज लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साठ खाटांची क्षमता असणाऱ्या रुग्णालयाला द्रवरुप ऑक्सिजन साठीच्या खर्चात दुप्पटीने वाढ झाली असून आता हा खर्च ९ ते १० लाख रुपयांपर्यंत गेला असल्याचे दिनांक १६ जून,२०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, शहरी भागातील रुग्णालयात द्रवरुप ऑक्सिजन साठविण्यासाठी १० हजार लिटरच्या टाक्या तयार केल्या जात असून ग्रामीण भागातील तालुक्याच्या ठिकाणी तशी व्यवस्था नसल्याने सिलेंडरद्वारे ऑक्सिजनचा पुरवठा करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिलेंडरद्वारे फक्त ७ घनमीटर इतका प्राणवायू असल्याने द्रवरुप ऑक्सिजनचा दर व शुध्दता लक्षात घेता जिल्हा रुग्णालयात टाकीद्वारे ऑक्सिजन साठयांची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी औरंगाबाद येथे दिनांक १६ जून,२०२० रोजी वा त्यादरम्यान जाहीर केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०७-२०२३) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

कोविड साथरोगजन्य परिस्थितीत ऑक्सिजनची मागणी वाढल्यामुळे स्थानिक पातळीवरील बाजारभावाप्रमाणे द्रवरूप ऑक्सिजन साठीच्या खर्चात वाढ झाल्याचे आढळून आलेले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेंमध्ये १०% Type B व D सिलेंडरद्वारे, २०% PSA Plant द्वारे व उर्वरित ७०% LMO Tank द्वारे ऑक्सिजन उपलब्धतेबाबत नियोजन केलेले आहे. ग्रामीण रुग्णालय स्तरापर्यंत द्रवरुप ऑक्सिजन साठयाकरीता ६ KL / १३ KL / १० KL / २० KL इ. क्षमता असलेल्या LMO Tank उपलब्ध असून प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर सिलेंडर तसेच ऑक्सिजन Concentrators द्वारे ऑक्सिजन पुरवठा करण्यात आला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सद्यस्थितीत राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये १९९ लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँक कार्यान्वित आहेत. १० KL क्षमतेचे १४२ LMO Tank आणि २० KL क्षमतेचे २०० LMO Tank नव्याने स्थापित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई येथील आदित्य कॉलेज आणि मानसी स्टॉक कंपनीमध्ये लसीकरण मोहिमेत झालेला गैरप्रकार

**(२) ३४०११ (१०-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील आदित्य कॉलेज तसेच मानसी स्टॉक कंपनीमध्ये माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान बोरिवली (मुंबई) येथील लसीकरण मोहिमेत सुमारे ४०० पेक्षा जास्त व्यक्तींना बनावट लस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदअनुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.

आदित्य कॉलेज, मुंबई येथे २१३ नागरिकांना, दि. ०३ जून, २०२१ रोजी व मानसी स्टॉक कंपनी, मुंबई येथे ५१४ नागरिकांना, दि. २६ मे, २०२१ व दि. २७ मे, २०२१ रोजी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लस म्हणून बनावट लस श्री. अमेय पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट या खाजगी संस्थेमार्फत देण्यात आलेली आहे. यासंदर्भात सदर संस्थेने मुंबई महानगरपालिकेला पूर्वसूचना दिलेली नव्हती अथवा महानगरपालिकेची परवानगी घेतलेली नव्हती.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बोरीवली पोलीस ठाणे येथे आदित्य कॉलेज, मुंबई येथील लसीकरण मोहिमेतील संबंधितांविरुध्द गु.र.नं ८५०/२०२१ भा.दं.वि. कलम ३०८, २०१, १८८, ४२०, १२०(ब), २७०, २७४, २७५, २७६, ४७१, ४६७, ३४, सह कलम ५२ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, सह कलम १८(अ), २४, २७, २८(अ) औषधी द्रव्ये आणि सौंदर्य प्रसाधन अधिनियमनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींविरुध्द न्यायालयात कोर्ट केस क्र. २१७०/पी.डब्ल्यू/२०२१ अन्वये दि. २६.०८.२०२१ रोजी दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

तसेच मे मानसी स्टॉक कंपनी, मुंबई येथील लसीकरण मोहिमेतील संबंधितांविरुध्द गु.र.नं ८५५/२०२१ भा.दं.वि. कलम ३०८, २०१, १८८, ४२०, १२०(ब), २७०, २७४, २७५, २७६, ४७१, ४६५, ४६७, ४६८, ३४, सह कलम ५२ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, सह कलम १८(अ), २४, २७, २८(अ) औषधी द्रव्ये आणि सौंदर्य प्रसाधन अधिनियम, सह ४३(अ), ६६(क), माहिती तंत्रज्ञान अधिनियमनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींविरुध्द न्यायालयात कोर्ट केस क्र. २१५५/पी.डब्ल्यू/२०२१ अन्वये दि. २५.०८.२०२१ रोजी दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिपळूण येथील लाईफ केअर रुग्णालयात कोवीड रुग्ण म्हणून दाखल झालेल्या रुग्णाचे बील माफ करणेबाबत

**(३) ३५०८४ (१०-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण येथील लाईफ केअर रुग्णालय श्री.सुनिता प्रभाकर सकपाळ यांना दिनांक ५ मे, २०२१ ते दिनांक १४ मे,२०२१ या दरम्यान कोविड रुग्ण म्हणून दाखल केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना कोविड रुग्ण म्हणून काहीच फायदे देण्यात आले नसून त्यांच्याकडून उपचाराचे रु ९४,१४४/- इतके बील वसुल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णांच्या नातेवाईकांनी जिल्हा शल्यचिकित्सकातर्फे जिल्हा अधिका-यांना बिल माफ करण्याबाबत पत्र पाठवून मागणी दिनांक २२ जून,२०२१ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

श्रीमती सुनिता प्रभाकर सकपाळ यांना चिपळून येथील लाईफ केअर रुग्णालयात दाखल केले नसून गोवळकोट मदरासा कोविड सेंटर येथे दाखल केले होते.

(२) सदर रुग्णालय महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकीकृत योजनेमध्ये समाविष्ट नसल्याने रुग्णालयाने रुग्णावर केलेल्या उपचाराचा खर्च आकारण्यात आला आहे.

( ३) व (४) दिनांक २२ जुन, २०२१ रोजी रुग्णाच्या नातेवाईकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांनी रुग्णांवर आकारण्यात आलेली रु. ५६,९५०/- इतकी रक्कम योग्य असल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयातील पदे भरण्याबाबत**

**(४) ३७९९५ (२४-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात कोरोनाच्या तिस-या लाटेत रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सामान्य रुग्णालय, खामगाव येथे पदे भरणे बाबत वैद्यकीय अधिकारी, खामगाव यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांना वारंवार पत्रव्यवहार केला आहे ,हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून चाणक्य इ सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिनांक ७ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास पुरवठा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळात सुद्धा सामान्य रुग्णालयात कंत्राटी मनुष्यबळ न पुरवण्याचे कारणे काय आहेत,

(५) असल्यास,सामान्य रुग्णालय, खामगाव येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०७-२०२३) :** (१), (२), (३) होय.

(४) व (५) कंत्राटी पदे भरण्याकरीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत दुसऱ्या लाटेमध्ये बाहयस्त्रोत यंत्रणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून चाणक्य इ. सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिनांक ७ जून, २०२१ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. तथापि, त्यानंतर दुसरी लाट ओसरल्यामुळे तसेच कोविड तिसऱ्या लाटेत कोविड बाधित रुग्ण बऱ्याच प्रमाणात घरीच उपचार घेत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने, उपरोक्त वाढीव कंत्राटी मनुष्यबळ देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीने खारीज केला.

तसेच अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये ECRP-I अंतर्गत आरटीपीसीआर लॅब वगळता इतर कुठल्याही त्रिस्तरीय कोविड यंत्रणेकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिलामधील स्तनांच्या कर्करोगाचे वाढणारे प्रमाण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(५) ३८९३३ (०७-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या एका संस्थेमार्फत माहे एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ या कालावधीत करण्यात आलेल्या मॅमोग्राफी तपासण्यांमधून ४० टक्के महिलांमध्ये स्तनांचा कर्करोग होण्यास कारणीभूत असणारे घटक आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) तसेच, अनुवांशिकतेमुळे २५ टक्के महिलांना स्तनाचा कर्करोगाचा उच्च धोका असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाबाबत पुरेशी जनजागृती नसल्याने अनेक महिला उपचारासाठी पुढे येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, या आजाराविषयी महिलांमध्ये जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दि.२० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या NCRP-२०२० च्या अहवालानुसार महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन स्तरावरुन राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महिलांमध्ये कर्करोगाबाबत व उपचाराबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

(४) पॉप्युलेशन बेस्ड स्क्रीनींग या उपक्रमांतर्गत वय वर्ष ३० वरील सर्व लोकांची कर्करोगाबाबतची तपासणी आशा व एएनएम यांचे मार्फ़त करण्यात येते. तालुकास्तरावर HLL यांचेमार्फ़त कर्करोगाची तपासणी करुन पुढील उपचाराकरीता TCC आणी शासनाच्या अधिनस्त शासकीय कर्करोग रुग्णालये तथा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय याठिकाणी कर्करुग्णांना संदर्भित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसमत (जि. हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत**

**(६) ३९९७५ (२४-०४-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०११ च्या लोकसंख्येनुसार आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याकरिता बृहत आराखडा (Master Plan) तयार करण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसमत (जि.हिंगोली ) येथे सध्या ६० खाटांचे स्त्री रुग्णालय असुन येथील लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ६० खाटांच्या स्त्री रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची जनतेकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण हिंगोली जिल्ह्यात एकही स्त्री रुग्णालय नसल्यामुळे जिल्ह्यातून तसेच परभणी व पूर्णा परिसरातील रुग्ण वसमत येथील महिला रुग्णालयात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणकानुसार येथे अस्तित्वात असलेल्या ६० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांचे रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.

पालकमंत्री, हिंगोली जिल्हा तथा मा. शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने त्याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय.
(५) उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन निकषानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर येथील मध्यवर्ती हॉस्पिटलला ठाणे जिल्हा नियोजन समिती मध्ये घेण्याबाबत**

**(७) ४०४९२ (११-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) उल्हासनगर ३ मध्यवर्ती हॉस्पिटल ला जिल्ह्याचा दर्जा प्राप्त असून या रुग्णालयामध्ये ग्रामीण भागातून रुग्ण उपचारासाठी येत असतात तथापि रुग्णालयाला निधी कमी प्रमाणात येत असल्याने रुग्णांना सुविधा उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाला निधी कमी मिळत असून अधिक चा निधी मिळावा तसेच ठाणे जिल्हा नियोजन समिती मध्ये समाविष्ट करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारा मा उपमुख्यमंत्री तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास , सिव्हिल हॉस्पिटल ला DPDC चा निधी मिळतो त्या मधून ६०:४० नुसार निधी उपलब्ध करू द्यावा अशी मागणी ही सदर निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयाला ठाणे जिल्हा नियोजन समिती मध्ये समाविष्ट करणे तसेच निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे कोणती?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर या सस्थेचा जिल्हा नियोजन समिती, ठाणे मध्ये समाविष्ट करावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले नसून, त्यांचे दि. २९.९.२०२१ च्या पत्राची प्रत प्राप्त झालेली आहे.
(३) मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर या रुग्णालयाचा जिल्हा नियोजन समिती (DPDC) मध्ये समाविष्ट करण्याबाबतची मागणी केलेली आहे.
(४) उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांनी दि. ३०.१२.२०२२ च्या पत्रान्वये मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर या रुग्णालयाचा जिल्हा नियोजन समितीमध्ये (DPDC) समाविष्ठ करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना विनंती केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयातील प्रकल्प प्रेरणा विभागात झालेली अनियिमितता

**(८) ४३०५९ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात प्रकल्प प्रेरणा विभागातील मानसोपचार तज्ञ यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट देण्याच्या नावाखाली वापरलेल्या वाहनाचे सूमारे १४ लाख रुपयांचे देयक काढले असल्याचे निदर्शनास आले असून सदर वाहन एका खजगी व्यक्तीचे असून या बाबत त्यास कसलीही कल्पना नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात मागील तीन वर्षात आत्महत्या केलेल्या ३८८ शेतकऱ्यांपैकी केवळ ५३ कुटुंबाना प्रकल्प प्रेरणा विभागाने भेटी दिल्या तसेच ८८ गावात मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले असून एवढ्या ठिकाणी जाण्यासाठीच या विभागाने सूमारे १३ लाख ६३ हजार रुपयंचे बिल काढून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या वाहन क्रमांकावर सदरहू बिल काढण्यात आले आहे ते वाहन आरोग्य विभागाशी सलंग्न नसून भेटी साठी वापरण्यात आलेले वाहन जीप असून प्रत्यक्षात बिल काढण्यात आलेले वाहन ही छोटी कार असल्यामुळे सदर प्रकरणात खाजगी वाहन चालकासह शासनाची आर्थिक फसवणूक करून अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणात जबाबदार असण्याऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक १३ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०७-२०२३) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांच्या स्तरावर चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहराती लालपेठ येथी एरिया रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महिलेचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू

**(९) ४३८६० (२४-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहराती लालपेठ येथी एरिया रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ४८ वर्षीय श्रीमती पोसूबाई रासूर या महिलेला रेफर करण्यास संबंधित डॉक्टरांनी दिरंगाई केल्यामुळे सदर महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याची निदर्शनास आहे आहे, हे खरे आहं काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक संघटना यंग चांदा ब्रिगेडच्यावतीने वरिष्ठ अधिका-यांकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने दोषी आढळलेल्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१)हे खरे आहे,
(२) सदर रुग्णालय हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील Western coalfields Ltd. यांचे आहे. सदर प्रकरणामध्ये डॉक्टरांनी हलगर्जीपणा केला नसल्याचे मुख्य चिकित्सा अधिकारी, क्षेत्रिय चिकित्सालय, लालपेठ चंद्रपूर यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य सेवेसंदर्भात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१०) ४५८४९ (११-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील नागरीकांना आरोग्य सेवेसंदर्भातील सोयी-सुविधा मिळत नसून येथील ग्रामीण रुग्णालयात मृत रुग्णाचे शवविच्छेदन करण्यासाठी (पोस्टमॉर्टम) डॉक्टर देखील उपलब्ध नसल्यामुळे नातेवाईकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार येथील ग्रामीण रुग्णालयात मृत रुग्णाचे शवविच्छेदन करण्यासासाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉंक्टरांच्या निष्काळजीपणाने प्रसुती दरम्यान महिलेचा झालेला मृत्यू**

**(११) ४६०७८ (११-१०-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉक्टरांच्या निष्काळजीपणाने प्रसुती दरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी करुन सबंधितावर गुन्हा नोंद करण्याची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल २०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचे आश्वासन देऊनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय, व त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :** (१)हे खरे आहे,
(२) हे खरे नाही. चौकशी झालेली आहे.
(३) चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये रुग्णाचा मृत्यू HELLP with Disseminated intravascular Coagulation ने झाला असल्याचे नमूद केले आहे, त्यात जिल्हा रुग्णालयात उपचारात निष्काळजीपणा झाला नाही, असे चौकशी समितीचे अभिप्राय आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात कोरोना काळात लागू करण्यात आलेले निर्बंध शिथील करुन अंगणवाडया सुरु करण्याबाबत**

**(१२) ४७३७२ (०९-११-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना प्रतिबंधक नियम शिथील झाले असले तरी अंगणवाडयावरील निर्बंध अद्याप शिथील करण्यात आले नसल्याने अंगणवाडया बंद असल्याने मुलांना मिळणारा ताजा आहारही बंद असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आहारासोबतच पूर्वप्राथमिक शिक्षणावरही याचा परिणाम होत असल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अंगणवाडया सुरू करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अंगणवाड्यांवर निर्बंध शिथील करून अंगणवाडया सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०७-२०२३) :** (१) व (२) राज्यात कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी केंद्र दिनांक २९ एप्रिल,२०२२ पासून पुर्ववत सुरू करण्यास शासन आदेश दिनांक २८.०४.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने अंगणवाडी केंद्रामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण घेणा-या ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थींना गरम ताजा आहार सुरु करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देखील निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हात नियुक्त करण्यात आलेल्या ''सखी वन स्टॉप सेंटर''च्या**
**कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबबात**

**(१३) ४७८४२ (०९-११-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला बालविकास विभागा अंतर्गत प्रामुख्याने महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी पालघर येथे नियुक्त करण्यात आलेल्या ''सखी वन स्टॉप सेंटर''च्या कर्मचा-यांना गेल्या ६ महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर सेंटरसाठी १४ कर्मचारी मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ६ कर्मचा-यांची नियुक्ती अद्यापही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हातील ''सखी वन स्टॉप सेंटर''साठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याचे थकीत वेतन अदा करणेसह मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०४-०७-२०२३) :** (१) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत सखी वन स्टॉप सेंटर, पालघर करीता इप्लीमेंटींग एजेन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर एजेन्सीमार्फत माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंतचे मानधन सखी वन स्टॉप सेंटर, पालघर च्या कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले आहे.

(२) सदर योजनेच्या निकषानुसार एकूण १४ पैकी १२ पदे भरण्यात आली असून केवळ समुपदेशक व सेक्युरीटी गार्डची प्रत्येकी एक अशी एकूण २ पदे भरण्यात आलेली नाहीत.

(३) सखी वन स्टॉप सेंटर मधील कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे. वन स्टॉप सेंटर करिता इप्लीमेंटींग एजेन्सीमार्फत सर्व पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंगणावडयांच्या परीसरात परसबागेसारखे उपक्रम राबविण्याबाबत

**(१४) ४८४८९ (०४-११-२०२२).श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे एक लाख अंगणवाडया कार्यरत असून प्रत्येक अंगणवाडीच्या परीसरातील परसबाग तयार करुन त्याचा उपयोग अंगणवाडीतील मुलांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात केला जावा असे निर्देश महिला व बालविकास विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (Nationmal Family Health Survey ५) च्या अहवालानुसार राज्यातील ० ते ५ वयोगटातील बालकांमध्ये कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झाल्याने परसबागेसारखे उपक्रम अंगणवाडीच्या परीसरात राबविणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१४-०७-२०२३) :**(१) अंशतः खरे आहे.

राज्यात ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्र स्वमालकीच्या इमारतीमध्ये कार्यान्वित आहे आणि त्या ठिकाणी परसबाग तयार करण्याकरिता जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी परसबाग तयार करून त्याचा उपयोग अंगणवाडीमध्ये दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात केला जावा असे निर्देश सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहे.

(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मागील ३ वर्षाच्या मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषणाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे:-

| महिना/वर्ष | एकुण वजन घेतलेली बालके | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| मार्च २०२१ | ६०८२२०० | ५४७५८९५ | ५११५१४ | ८६७९१ | १.४३ |
| मार्च २०२२ | ६२१६२६७ | ५६९६२४७ | ४४२६६४ | ७७३५६ | १.२४ |
| मार्च २०२३ | ५९३७४७९ | ५४५६२६० | ४०८८३८ | ७२३८१ | १.२२ |

वरील माहितीनुसार कुपोषणाच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. कुपोषण कमी करण्यासाठी परस बागेसारखे उपक्रम अंगणवाडीच्या परिसरात राबविणे गरजेचे आहे. त्यानुसार ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्र स्वमालकीच्या इमारतीमध्ये कार्यान्वित आहे आणि त्या ठिकाणी परसबाग तयार करण्यास जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी परसबाग तयार करून त्याचा उपयोग अंगणवाडीमध्ये दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात केला जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महाराष्ट्र भुषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत**

**(१५) ४९४६५ (१८-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील महाराष्ट्र भुषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयातील अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे उपचारासाठी येणा-या रूग्णांना रूग्ण सेवेत अनेक त्रुटी व गैरसोय होत असल्याने त्यांना आरोग्य सुविधांपासून वंचित रहावे लागत असून त्यांना शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास येत असल्याने या समस्या सोडविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, पॅरामेडीकल स्टाफ यांच्यासाठी बांधलेल्या निवासस्थानाचे काम अनेक वर्ष अर्धवट स्थितीत असल्याने त्याना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रूग्णालयाच्या बाजुलाच कर्मचा-यासाठी निवासस्थान उभारल्यास कर्मचा-याचा येण्याजाण्याचा वेळ कमी होवून त्यावेळेत त्यांना रूग्णसेवेवर अधिक लक्ष केंद्रीत करता येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या रुग्णालयातील रूग्णांना रूग्णसेवा देण्याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कारवाई तसेच रुग्णालयातील अधिकारी वकर्मचा-यांची निवासस्थाने उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०७-२०२३) :**(१) होय

(२) होय

(३) होय

(४) मा. लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांनी सदस्य समिती गठीत करुन त्याबाबतचा अहवाल दि.०६.१०.२०२२ रोजी आयुक्तालयास सादर केला आहे. पनवेल, जि. रायगड येथील महाराष्ट्र भुषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता मंजूर असलेल्या निवासस्थानाचे बांधकाम, कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांच्या स्तरावरुन रुग्णालयाच्या लगतच सुरु करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालविवाहाचे प्रमाण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना.**

**(१६) ५००७६ (२०-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील माहुली जहागीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अल्पवयीन मुलीचा बालविवाह होवून तीची प्रसूती झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोल्हापूर जिल्हयात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२२ मध्ये बालविवाह झाल्याचे किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत,

(३) असल्यास, उक्त घटनेवरुन राज्यात बालविवाह होत असून पोक्सो व बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासह समाजात जनजागृती तसेच बालविवाह करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
माहूली जहागीर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या घटनेमध्ये सदर बालिकेचे लैंगिक शोषण झाले असून त्यामधून सदर बालिकेला गर्भधारणा होऊन तिची प्रसुती झाली आहे. दोषी व्यक्तीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून दोषी व्यक्तीला अटक झाली आहे. सदर बालिकेला काळजी व संरक्षणाची गरज असल्याने बाल कल्याण समिती अमरावती समोर हजर करण्यात आले असून बाल कल्याण समितीच्या आदेशाने बालिकेचे पुनर्वसन तिच्या कुटुंबात करण्यात आले आहे.
(२) कोल्हापूर जिल्ह्यात माहे ऑगस्ट २०२२ मध्ये दोन व माहे सप्टेंबर २०२२ मध्ये तीन अशी एकूण पाच बालविवाह झाल्याचे प्रकरणे निदर्शनास आले आहेत.
(३) राज्यात ग्रामसेवकांना व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे. बाल विवाह प्रतिबंध अधिनियमाच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समितीच्या भूमिकेबाबतची माहिती देण्याच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलीस पाटील यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. तसेच ३६ जिल्ह्यातील जिल्हा बाल संरक्षण कक्षातील कर्मचा-यांचे बाल विवाह प्रतिबंधासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि युनिसेफ यांनी एकत्रितरित्या तयार केलेल्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करिता प्रायोगिक तत्वावर १२ जिल्ह्यांमध्ये सक्षम या योजनेंतर्गत जिल्हा कृती दल स्थापन केले आहे. सदर कृती आराखड्यांतर्गत पोलीस अधिका-यांना POCSO आणि बाल विवाह प्रतिबंध अधिनियम आणि प्रक्रियांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार तालुक्यात कुष्ठरुग्णांचे निदान व उपचार करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१७) ५०१९२ (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार तालुक्यात १ लाख ५४ हजार १७१ नागरिकांच्या केलेल्या तपासणीत ३२ नवे कुष्ठरुग्ण आढळून आल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुष्ठरोगावर लस उपलब्ध नाही म्हणून कुष्ठरुग्णांच्या जवळच्या सहवासात येण्या-या व्यक्तींना आजार होऊ नये म्हणून लसी ऐवजी गोळया देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुष्ठरुग्णाचे निदान तसेच उपचार वेळीच करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.
जव्हार तालुक्यात दिनांक १३ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीत राबविलेल्या शोध मोहिमेत ३२ नवे कुष्ठरुग्ण आढळून आले असून त्यांना त्वरीत बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.
नवीन शोधलेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासितामध्ये कुष्ठरोग प्रसार होऊ नये याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व १६५ सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा (पीईपी) देण्यात आली आहे.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधुन त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते. तसेच राज्य स्तरावरुन व जिल्हा स्तरावरुन कार्यक्षेत्रामध्ये नियमितपणे संनियंत्रण केले जाते.
कुष्ठरुग्णांचे निदान व वेळेत उपचार करण्यासाठी कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना करण्यात येत आहे.

• विविध माध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती देवून कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वत:हून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्या मार्फत संशयीत रूग्ण शोधण्यात येतात. निदान निश्चिती झाल्यानंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.
• सन २०१६-१७ पासून दरवर्षी "कुष्ठरुग्ण शोध मोहिम व स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहीम" राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात आला.
• सन २०२२-२३ मध्ये दिनांक १३ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीत कुष्ठरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली व आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार त्वरीत सुरु करण्यात आला.
• नवीन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.
• संदर्भ सेवा केंद्रामार्फत कुष्ठरुग्णांना सेवा दिल्या जातात.
• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते.
• मागील पाच वर्षात शुन्य कुष्ठरुग्ण आढळलेल्या गावात अवैद्यकीय सहाय्यक / कुष्ठतंत्रज्ञ यांचे मार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंदेवाही , सावली व ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर )येथील उपजिल्हा रुग्णालय नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम व अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणेबाबत

**(१८) ५०४७५ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली येथे मंजूर असलेल्या ५० खांटाच्या उपजिल्हा रुग्णालय नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम व वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी तसेच ब्रम्हपूरी येथील १०० खांटाचे उपजिल्हा रूग्णालयातील वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यासाठीचे प्रस्ताव प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे प्रंलबित असल्यामूळे या कामास प्रशासकीस मान्यतेसह निधी उपलब्ध होण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनाक २० ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या आरोग्यांच्या दृष्ट्रीने व रुग्णांना आरोग्याच्या सोयी तातडीने उपलब्ध होण्यासाठी या सर्व बांधकामास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०७-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये उपजिल्हा रुग्णालय सिंदेवाही जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व

निवासस्थान बांधकामास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये उपजिल्हा रुग्णालय सावली जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १६ जून, २०२३ अन्वये १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपूरी येथील निवासस्थान बांधकामास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिकलसेल क्रायसिस या आजाराकरीता शासनाकडून मिळणारा उपचाराचा खर्च वाढविण्याबाबत**

**(१९) ५१०७० (१८-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिकलसेल क्रायसिस या आजाराकरीता शासनाकडून उपचाराकरीता दोन हजार रुपयपर्यंतचा खर्च देण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्याच्या वाढत्या महागाईच्या काळात सदरील उपचाराचा खर्च वाढविणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील आर्थिक वर्षात वरील आजारावर किती रुग्णांना या उपचाराचा लाभ मिळाला आहे,
(४) असल्यास, सिकलसेल क्रायसिस या आजारावरील शासनाकडून मिळणारा उपचाराचा खर्च वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१),(२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्यात सद्यस्थितीत १७२२३ सिकलसेल रुग्ण आढळून आले असून त्यामध्ये अंदाजे २५ ते ३० टक्के रुग्णांमध्ये सिकलसेल क्रायसिसची लक्षणे आढळून आली आहेत. या रुग्णांना या आजाराचा म्हणजेच सिकलसेल क्रायसिस मध्ये हाडांचे दुखणे, साध्यांचे दुखणे, ताप, दम लागणे, रक्तक्षय अशी लक्षणे दिसून येतात. अशा रुग्णांवर सर्व शासकीय रुग्णालयामध्ये मोफत उपचार व गरजेनूसार रक्तसंक्रमण करण्यात येते. त्यामध्ये T.Hydroxyurea, Folic acid, Antibiotic व वेदनाशामक औषधांचा वापर करण्यात येतो. T.Hydroxyurea, याच्या नियमित वापराने सिकलसेल क्रायसिसचे प्रमाण कमी होते.

सिकलसेल क्रायसिसचा उपचार सर्व शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत करण्यात येतो त्यामुळे सद्यस्थितीत शासनाकडून सिकलसेल क्रायसिस या आजाराच्या उपचारासाठी कोणताही खर्च अदा करण्यात येत नाही.

सिकलसेल रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सिकलसेल रुग्णांना (स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरुष ) अंदाजे दरमहा रु.१०००/- इतके अर्थ सहाय्य देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात कामगारांसाठी मल्टिस्पेशालिस्ट दवाखाना उभारण्याबाबत

**(२०) ५१०७५ (१८-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात कामगारांची संख्या अत्याधिक असून कामगारांसाठी स्वत:चा दवाखाना नसल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जिल्हयात कामगारांसाठी दवाखाना नसल्याने त्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने जिल्हयात कामगारांसाठी मल्टिस्पेशालिस्ट दवाखाना उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत सद्यस्थितीत चंद्रपुर जिल्हयात दि. ३१मार्च,२०२१ पर्यंत एकूण ३५२७३ एवढया विमाधारकांची संख्या असून जिल्हयात प्राथमिक वैद्यकीय सेवेकरीता एकूण ०३ राकावियो सेवा दवाखाने कार्यरत असून ०१ सेवा दवाखाना सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच, विमाधारकास बाह्य व आंतररुग्ण सेवा पुरविण्याकरीता महा-राकावि सोसायटीमार्फत बुक्कावार हॉस्पिटल, चंद्रपूर या खाजगी रुग्णालयाशी टाय अप करण्यात आलेले आहे.

(३) केंद्र शासनाच्या अधिनस्थ राज्य कामगार विमा महामंडळाने सन २०१६ मध्ये अंशत: क्षेत्रात राज्य कामगार विमा योजना लागू असलेल्या राज्यातील चंद्रपुरसह एकूण २० जिल्ह्यातील उर्वरीत संपुर्ण क्षेत्रात राज्य कामगार विमा योजना लागू केली होती. त्यानुसार चंद्रपुर जिल्ह्यात वाढलेली कामगारांची व लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन त्या ठिकाणी राज्य कामगार विमा रुग्णालय स्थापित करण्याकरीता राज्य कामगार विमा महामंडळास दि.२८.०३.२०१८ रोजी कळविण्यात आलेले आहे. या बाबतचा पुन:श्च प्रस्ताव राज्य कामगार विमा महामंडळास १२.०६.२०२३ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जव्हारच्या कॉटेज रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर आणि मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयांचे विस्तार करण्यासाठी नव्या इमारतींच्या बांधकामाला मंजूरी देण्याबाबत

**(२१) ५११३३ (१८-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार कॉटेज रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर आणि मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयांचा २० खाटांचा विस्तार करण्यासाठी नव्या इमारतींच्या बांधकामाला सन २०१२ मध्ये मंजुरी देण्यात आली असून अद्याप इमारतच्या बांधकामास सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयांचा विस्तार लांबणीवर पडल्यामुळे या भागातील रुग्णांना ठाणे किंवा नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयांच्या विस्तारास मंजुरी देण्यात येऊनही अद्याप इमारतीच्या बांधकामास सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे
(२) खरे नाही.
सद्यस्थितीत उपजिल्हा रुग्णालय जव्हार (१०० खाटा) व ग्रामीण रुग्णालय मोखाडा (३० खाटा) जि. पालघर येथे येणा-या सर्व रुग्णांना आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यात येत आहे.
(३) व (४) उपजिल्हा जव्हारचे १०० खाटांवरुन २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन बांधकामाचे रु.९०६२.०० लक्ष इतक्या रकमेस शासन निर्णय दि.२०.०९.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारत बांधकामास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच २०० खाटांच्या रुग्णालय बांधकामासाठी जागा कमी पडत असल्याने नवीन जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

ग्रामीण रुग्णालय मोखाडा येथील श्रेणीवर्धीत ५० खाटांचे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तांत्रिक मंजूरीसाठी मुख्य अभियंता यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे. सदर अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त होताच शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

---

**केज (जि. बीड.) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देणेबाबत**

**(२२) ५११६२ (२२-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड.) विधानसभा मतदारसंघातील १) आपेगाव २) बर्दापूर ३) भावठाना ४) बनसारोळा ५) विडा ६) चिंचोली माळी ७) आडस ८) राजेगाव ९) युसुफवडगाव या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका ह्या जवळपास १६ ते १७ वर्ष जुन्या असून नादुरुस्त व बंदअसल्याने ग्रामीण भागातील गाव,वस्ती, तांडे येथील रुग्णांची गैरसोय होत असल्यामुळे सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांना तातडीने नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास,वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नवीन रुग्णवाहिकेसाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.३१.०५.२०२१, दि.०४.०३.२०२३ व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे पत्र दि.०३.०९.२०२१ रोजी प्राप्त झाले होते. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास डीपीडीसी, वित्त आयोग निधी, मानव विकास निधी, आमदार निधी, खासदार निधी, सेवाभावी संस्था यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेऊन रुग्णवाहिका खरेदी करण्याचे दि.०७.०७.२०२१, दि.१३.०५.२०२२ व दि.२३.०४.२०२३ च्या पत्रान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना कळविण्यात आले आहे.
(२) रुग्णवाहिका खरेदीसाठी डीपीडीसी कडे निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरुन सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयात नविन अंगणवाडी सुरु करणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) ५१२२३ (२०-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात अंगणवाडीची व्याप्ती वाढविण्याबाबत सर्वेक्षण करून आवश्यक त्या ठिकाणी अंगणवाडी सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, अमरावती यांच्या दि. १५ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असल्यास किती नवीन अंगणवाडी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच, अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अंगणवाडी सेविकांची ८ व मदतनीसांची ९२ पदे रिक्त असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादाम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती जिल्ह्यात नविन अंगणवाडी सुरु करण्याच्या प्रस्तावावर तसेच अंगणवाडी सेविकांची व मदतनीसांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अमरावती जिल्हयात ३ नागरी प्रकल्प कार्यरत असून सदर प्रकल्पांकडून प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे नवीन अंगणवाडी केंद्र मंजुरी साठीचे प्रस्ताव सादर केलेले आहेत.

| अ. क्र. | प्रकल्पाचे नांव | प्रस्तावित नवीन अंगणवाडी केंद्र |
|---|---|---|
| १ | बाविप्रअ (नागरी) अमरावती जुना | ८ |
| २ | बाविप्रअ (नागरी) अमरावती नवीन | ९ |
| ३ | बाविप्रअ (नागरी) अचलपूर-दर्यापूर-अंजनगांव सूर्जी-वरुड-मोर्शी | २८ |
| | एकुण | ४५ |

(३) अमरावती जिल्हयातील नागरी प्रकल्पांमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | रिक्त पदे सेविका | रिक्त पदे मदतनीस |
|---|---|---|---|
| १ | बाविप्रअ (नागरी) अमरावती जुना | १७ | ८६ |
| २ | बाविप्रअ (नागरी) अमरावती नवीन | ३ | ३२ |
| ३ | बाविप्रअ (नागरी) अचलपूर-दर्यापूर-अंजनगांव सूर्जी-वरुड-मोर्शी | ४ | ५२ |
| | एकूण | २४ | १७० |

(४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजनेतंर्गत नवीन अंगणवाडी सुरु करण्याकरिता केंद्र शासनाची मंजुरी आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र शासनास राज्यात ८०८४ नवीन अंगणवाडी केंद्र मंजुरीचा सुधारित प्रस्ताव सादर केलेला आहे.

तसेच, राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ९.१.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

---

### राज्यातील निवासी डॉक्टरांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२४) ५१३४७ (२३-०१-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ निवासी डॉक्टराची १ हजार ४३२ नवीन पदनिर्मिती संबंधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) तसेच त्यांना विद्यावेतनही वारंवार अनियमितपणे देण्यात येत असून वरिष्ठ डॉक्टरांना सर्व ठिकाणी एकसारखे वेतन द्यावेत अशी ही मागणी आहे, हे ही खरे आहे काय ,

(३)असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन डॉक्टरांच्या मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०२३) :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवर वरीष्ठ निवासी संवर्गातील मानधन तत्त्वावरील १४३२ पदे निर्माण करण्यास दि. ०६.०१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी संवर्गातील डॉक्टरांना समान वेतन लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरीष्ठ निवासी या पदाकरीता एकसमान मानधन अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाड ( जि.रायगड ) येथे असलेल्या ट्रामा केअरची दुरुस्ती तसेच उपजिल्हा रुग्णालयास दिलेल्या कामाकरिता निधीची तरतूद करणेबाबत

**(२५) ५१७२२ (२१-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड ( जि.रायगड ) येथे असलेल्या ट्रामा केअरची दुरुस्ती तसेच १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास शासनाने मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूरी दिलेल्या रुग्णालयाच्या कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे ,

(३) तसेच, सदर कामास प्रत्यक्षात कधीपासून सुरवात करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :** (१) होय

(२) १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकाम खर्चाची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अप्राप्त आहेत.

(३) प्रस्तुत खर्चाची अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर त्यास शासनाची प्रशासकीय मान्यता व अनुदान उपलब्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या बहुतांशी कामगारांचा विमा (ESIC) काढला जात नसल्याबाबत**

**(२६) ५२१७४ (२१-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या बहुतांशी कामगारांचा विमा (ESIC) काढला जात नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेत कंत्राटी पध्दतीने काम करणारे कामगार आपला जीव धोक्यात टाकून साफसफाईची कामे तसेच रूग्णालयातील रूग्णांच्या जखमेवरील मलमपट्टी करणे, व्हेंटीलेटर बदलणे, सलाईन लावणे, रूग्णांची उचलठेव करणे, अतिदक्षता विभागातील रूग्णांची कामे करणे आदि कामे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामगारांशी धोकादायक कामे करताना अपघात झाल्यास त्यांचा विमा (ESIC) काढला नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना विमा (ESIC) योजना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, स्थानिक स्वराज संस्थांअंतर्गत साफसफाईच्या कामाकरीता सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात येते. तर रुग्णालयातील विविक्षित कामासाठी अधिपरिचारीका, परिचारीका, आया, परिसेविका, कक्ष परिचर, ड्रेसर, शिपाई इ. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.
(३) व (४) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील कंत्राटी कामगारांना राज्य कामगार विमा योजना लागू करण्याबाबतची प्रारुप अधिसूचना दिनांक ३१.०३.२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवघर (ता.वसई,जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत १०० खाटांच्या उप जिल्हा रुग्णालयाचे काम सुरू करण्याबाबत**

**(२७) ५२२०७ (२१-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवघर (ता.वसई,जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत साधारणतः ५८ गुंठयाच्या जागेत शासनाने दिनांक ९ जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास मंजूर केलेल्या १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालयाच्या कामास ८ वर्षांचा कालावधी होऊनही विलंब झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई तालुक्यातील वाढती लोकसंख्येनुसार सर्वसामान्य जनतेला नवघर प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा मिळण्यास गैरसोय होत असल्याने १०० खाटांचे रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे
(२) वसई-नवघर, जि. पालघर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचे अंदाज व आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविण्यात आले आहे. वसई परिसरातील जनतेस विरार येथील ग्रामीण रुग्णालयातून तसेच वसई-विरार महानगरपालिकेच्या रुग्णालयातून रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील महिलांना सुरक्षा प्रदान करण्याबाबत**

**(२८) ५३३६८ (२४-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील महिलांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी तसेच सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या छळाबाबत तक्रारी आल्यास अशा प्रकारची चौकशी करण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयामध्ये शासनाने महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले होते या समितीला विशाखा समिती म्हणून संबोधले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात कोणत्याही शासकीय निम शासकीय कार्यालयात ही समिती स्थापन केल्याचे दिसून येत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, शासनाने याबाबत १९ सप्टेंबर २००६ रोजी अध्यादेश काढून ही त्याची अंमलबजावणी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसमत तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयात समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (१४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२०१३/प्रक्र. ६३/मकक, दि. १९ जून, २०१४ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण ) अधिनियम २०१३ व दि. ०९.१२.२०१३ च्या नियम अधिनियमातील तरतूदीनुसार ज्या आस्थापनेमध्ये १० किवा १० पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असेल, अशा प्रत्येक कार्यालयात लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये "अंतर्गत तक्रार निवारण समिती" स्थापन करण्याचे आदेश दिलेले होते. अशा समित्यांना विशाखा समिती म्हणून संबोधले जाते.
(२)कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ (प्रतिबंध , मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार वसमत ( जि. हिंगोली) तालुक्यातील २८ शासकिय व निमशासकिय आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) दि. १९ सप्टेंबर २००६ च्या अध्यादेशाच्या अनुषंगाने वसमत तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता मिळणेबाबत

**(२९) ५३४११ (२१-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय स्थापन करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या आधारावर इतर संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार मा.मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्रायाच्या आधारावर इतर संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बुलढाणा येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) येथील चाकण ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालय श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३०) ५३६९३ (२१-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयाचे शंभर खाटामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालय श्रेणीवर्धन करून माहे मार्च, २०१५ मध्ये रु. १३ कोटी व सन २०२० मध्ये अंदाजे ७२ कोटींचा निधी उपलब्ध देण्याबाबतची मागणी स्थानिकांनी सार्वजनिक आरोग्य विभागास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच निधी कधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :**(१), (२) व ३) शासन निर्णय दिनांक १९ डिसेंबर, २०२२ अन्वये चाकण जि.पुणे येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास "विशेष बाब" म्हणून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

श्रेणीवर्धीत १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे इमारत बांधकामाचे व कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रक आराखडे आरोग्य सेवा आयुक्तालयास प्राप्त झालेले आहेत. परंतू काणेत्याही रुग्णालयाचे अथवा प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करताना सध्या अस्तित्वात असलेल्या रुग्णालयाच्या बांधकामाच्या टाईप प्लॅनमध्ये केंद्र शासनाकडून निर्गमित IPHS च्या सन २०२२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक सुधारणांचा समावेश करुन अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन घेण्याबाबत उच्चाधिकार समितीमध्ये चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार सदर श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत व अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्याच्या अनुषंगाने IPHS च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्याच्या सूचना आयुक्तालयास कळविण्यात आलेल्या आहेत.

---

## राज्यात कर्करोग रुग्णांची संख्या वाढत असल्याबाबत

**(३१) ५४०३५ (२१-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७-१८ मध्ये ७८५० तर सन २०१८-१९ मध्ये ८७०० व २०१९-२० मध्ये ८७३४ जणांचा कर्करोगामुळे मृत्यू झाला असून सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, भंडारा, अमरावती, गोंदिया, जळगाव, नाशिक येथे कर्करोगामुळे झालेल्या मृत्यूंची संख्या तीनशेपेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्करोग होण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यात दिनांक १० नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यंत कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांची एकूण संख्या किती आणि कर्करोगामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या किती आहे,
(४) असल्यास, राज्यात कर्करोगावर नियंत्रण मिळवणे तसेच कर्करुग्णांना विहित वेळेत आणि योग्य उपचार उपलब्ध करून मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी कर्करुग्णांची माहिती शासनास कळविणे बंधनकारक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :**(१) होय
(२) Clinico-pathological profile of cancers in India - NCDIR २०२१ च्या सर्वेक्षणानुसार एकुण कर्करोगाच्या तुलनेत पुरुषांमध्ये ४८.७ % कर्करोग आणि महिलांमध्ये १६.५ % कर्करोग हे तंबाखु तथा तंबाखुजन्य पदार्थाच्या सेवनाशी निगडीत असल्याचे आढळून आले आहे. तसेच स्थलू जीवनशैली, Viral Infection आनुवंशिकता आणि दुर्मिळ कारणांमुळे कर्करोग होण्याचे संभाव्य धोके वाढतात.
(३) सन २०२२ अखेरपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालयात कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ८७१६ आणि कर्करोगामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या १७९९८ इतकी आहे. (मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या खाजगी तथा शासकीय रुग्णालयांची मिळून आहे.)
(४) NPCDCS कार्यक्रमांतर्गत वय वर्ष ३० वरील सर्व पुरुषांचे, महिलांचे मुख कर्करोग आणि महिलांचे गर्भाशय तसेच स्तनाचा कर्करोग तपासणी करणे व सदर तपासणी द्वारे प्राथमिक टप्यात निदान करुन निदान झालेल्या रुग्णांना संदर्भ सेवे द्वारे उपचार सुरु केले जातात. तसेच जनसामान्य मध्ये असंसर्गजन्यरोगांमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्याकरीता व त्यावर नियंत्रण ठेवण्यकरीता योग्य जीवनशैली बाबत जनजागृतीही केली जाते. कर्करोग रुग्णांची नोंद करण्याकरीता कर्करोग आजाराला Notifiable Disease करण्याकरीता शासन स्तरावर प्रस्तावित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मावळ (जि.पूणे) तालुक्यातील ग्रामीण तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे प्रस्ताव मुंजूरीकरीता प्रलंबित असल्याबाबत

**(३२) ५४११६ (२१-०१-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव कान्हे (ता.मावळ,जि.पूणे) येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन होऊन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर सेंटरच्या कामास शासनाकडून मंजुरी मिळाली असून रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकरिता एकूण ९१२.०३ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक तसेच हेल्थकेअर इन्फ्रास्ट्रक्चरची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करणेबाबतचे रु ११३२.८६ लक्ष चे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, सार्वजनिक प्रादेशिक विभाग पुणे यांचेकडून सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे मान्यतेकरिता माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आले असून सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, लोणावळा (ता.मावळ,जि.पूणे) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये मेडिकल फर्निचर, मेडिकल गॅस पाईप लाईन प्रणाली, शवागार उपकरणे, लिफ्ट व अग्निशमन प्रणाली सुविधा करणेबाबतचे रु १४९०.५२ लक्ष चे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कडून सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे मान्यते करिता माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आले असून सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
वडगाव मावळ, जि. पुणे येथील श्रेणीवर्धीत ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर सेंटरच्या तिस-या मजल्याच्या बांधकामाचे रु.९१२.०२ लक्ष इतक्या रकमेस शासन निर्णय दि.१३.०४.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच हेल्थ केअर इन्फ्रास्ट्रक्चरची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्याबाबतचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे.
(२) लोणावळा जि. पुणे येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये मेडीकल फ़र्नीचर, मेडीकल गॅस पाईप लाईन प्रणाली, शवागार उपकरणे, लिफ़्ट व अग्निशमन प्रणाली सुविधा करण्याबाबतचे अंदाजपत्रक शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे.
(३) वडगाव मावळ, जि. पुणे येथील उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर येथे हेल्थ केअर इन्फ्रास्ट्रक्चर अत्याधुनिक सुविधा तसेच लोणावळा, जि. पुणे येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये मेडीकल फ़र्नीचर, मेडीकल गॅस पाईप लाईन प्रणाली, शवागार उपकरणे, लिफ़्ट व अग्निशमन प्रणाली सुविधा कामाच्या दोन्ही अंदाजपत्रकाची त्रुटीची पूर्तता करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे व जिल्हा शल्य चिकित्सक पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(३३) ५४२९८ (१२-०६-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुला एवढाच मुलींचा जन्मदर वाढावा व स्त्री भृण हत्या रोखाण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या वतीने "माझी कन्या भाग्यश्री" योजना दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी पासून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रावेर तालुक्यात या योजनेतून पाच वर्षात फक्त ७२ जणांना लाभ मिळाला असल्याची बाब माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेची व्याप्ती वाढावी यासाठी स्थानिक प्रशासनाच्या वतीने प्रचार व प्रसारासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१४-०७-२०२३) :**(१) "माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजना" ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१७ रोजी पासून राबविण्यात येत आहे.
(२) रावेर तालुक्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प १ व २ या २ प्रकल्पांतर्गत सन २०१७ ते २०२३ या कालावधीमध्ये ३७ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी पात्र १७ लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात आला आहे. उर्वरित पैकी १३ प्रस्ताव पात्र असून त्यांना लाभ मंजूर करण्यात येत आहे तर ७ प्रस्तांवामध्ये कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत संबधितांना कळविलेले आहे.

(३) महिला व बाल विकास विभागामार्फत तसेच प्रकल्प स्तरावर सदर योजनेची जाहिरात प्रसिद्धी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटल येथे नर्सिंग स्कूल चालू करण्याबाबत

**(३४) ५४७०३ (२१-०१-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटलमध्ये मोठया प्रमाणावर ग्रामीण भागातील रुग्ण उपचारासाठी येत असून तेथे नर्सिंग स्कूल सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय यांनी पत्र क्र प्रसामा -२०१९/प्र क १०५आ ३अ /दिनांक २५ एप्रिल २०१९ नुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुधारित प्रस्ताव दिनांक २० जून, २०१९ रोजी राज्य शासनाकडे पाठविला असून शासनाकडून अद्यापही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
दि.१७.०८.२०२२ रोजीचे पत्र विभागास प्राप्त झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) उपसंचालक आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्याकडून त्रोटक प्रस्ताव प्राप्त झाल्याने मान्य निकषानुसार सुधारित प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथील परिचर्या महाविद्यालयाकरिता पद निर्मिती प्रस्तावास मंजुरी देणेबाबत

**(३५) ५४९८४ (२१-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथील परिचर्या महाविद्यालयाकरिता पद निर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत व सदरील पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या शासकीय परिचर्या महाविद्यालयाची (BSc Nursing) स्थापना व त्याकरिता पदनिर्मिती करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(३६) ५५६६० (२१-०१-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात २०२ खाटाचे मध्यवर्ती रुग्णालय असून या ठिकाणी दिवसाकाठी ४ ते ५ हजार रुग्ण उपचारासाठी येत असून येथे अनेक प्रकारची कॉलेज आहेत परंतू तेथे वैद्यकीय महाविद्यालय नसल्याने अंबरनाथ उल्हासनगर, बदलापूर, मुरबाड, शहापूर, कल्याण, कर्जत, कसारा तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकिय शिक्षणासाठी मुंबई किंवा बाहेरच्या राज्यात जावे लागत असल्याने येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकिय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नगर विकास विभागाने वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित केलेली जागा विचारात घेवून ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. तळेगांव ( ता. आष्टी,जि.वर्धा ) येथे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय मंजूर करण्याबाबत**

**(३७) ५५६८० (२१-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाचे नविन धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय उभारण्याचे धोरण ठरलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी विधानसभा मतदार संघातील मौ. तळेगांव (ता.आष्टी,जि.वर्धा) हे गाव मध्यवर्ती ठिकाणी असून यास तीन जिल्हे जोडले जात असून त्याठिकाणी महाराष्ट्र शासनाची ११९ हेक्टर आर. जमीन सुध्दा उपलब्ध असल्याने येथे शासनाच्या धोरणानूसार नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय मंजूर करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनीधी यांनी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनीधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार तसेच शासनाच्या धोरणानुसार मौजा मौ. तळेगांव येथे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) वर्धा जिल्ह्यात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

---

**गारगोटी (ता.भुदरगड,जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णलयातील पदनिर्मितीस मंजुरी देण्याबाबत**

**(३८) ५६४८३ (२२-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी (ता.भुदरगड,जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे ३० वरुन ५० खाटांच्या प्रमाणकानुसार पदनिर्मिती मंजुरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटूंबकल्याण मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबतचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव सहसंचालक, आरोग्यसेवा, मुंबई यांचे कार्यालयाकडुन प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटंब कल्याण यांचेकडे दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर करुनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही विभागाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, गारगोटी येथील उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम १००% पुर्ण होवुनही पदनिर्मिती नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याने पदनिर्मितीस मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,?

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) गारगोटी येथील उपजिल्हा रुग्णालयाकरीता (५० खाटांचे) निकषानुसार पदे निर्माण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्याबाबत**

**(३९) ५६५३२ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १८ वर्षे वयांवरील सर्व महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्याची मोहीम नुकतीच राबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहिमेअंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ अखेर पर्यत राज्यभरात एकूण किती महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली ,

(३) असल्यास, या आरोग्य तपासणी अंती स्त्रियांच्या आरोग्य विषयक प्रामुख्याने कोणत्या स्वरूपाच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत ,

(४) असल्यास, वैद्यकीय सहाय्य आवश्यक असलेल्या महिलांना शासनातर्फे कोणत्या स्वरूपाचे सहाय्य करण्यात आले अथवा करण्यात येत आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) दि ३१/१२/२०२२ पर्यंत राज्यात या मोहिमेअंतर्गत एकूण ४,३९,२४,१०० महिला लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

(३) (१) या अभियानाअंतर्गत एकूण २७,९७,३९४ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १,१८,१६९ मातांना उच्च रक्तदाबाची प्राथमिक लक्षणे आणि १,१३,२२९ मातांना तीव्र रक्तक्षयाची प्राथमिक लक्षणे आढळून आली.

(२) ३० वर्षावरील २,५७,१९८ लाभार्थ्यांना मधुमेहाचे प्राथमिक निदान तर ४,१९,५८४ लाभार्थ्यांना उच्च रक्तदाबाचे प्राथमिक निदान झाल्याचे आढळून आले. ६१,७२९ लाभार्थ्यांना कर्करोग सदृश संशयित लक्षणे आढळून आली.

(३) तसेच १,२८,६७१ लाभार्थ्यांना शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आलेले आहे.

(४) (१) "माता सुरक्षित तर घर सुरक्षित" या विशेष अभियानाअंतर्गत १८ वर्षे वयांवरील सर्व महिलांची तपासणी, औषधोपचार, शस्त्रक्रिया आणि समुपदेशन मोफत करण्यात आलेले आहे.

(२) या मोहिमे अंतर्गत उच्च रक्तदाबाचे अंतिम निदान झालेल्या ५७,४०९ गरोदर मातांवर, तीव्र रक्तक्षयाचे अंतिम निदान झालेल्या ४१,५१९ गरोदर मातांवर उपचार करण्यात आलेले आहेत.
(३) ३० वर्षावरील मधुमेहाचे अंतिम निदान झालेल्या २,५२,४५२ लाभार्थ्यांवर तर उच्च रक्तदाबाचे अंतिम निदान झालेल्या ४,१९,५८४ लाभार्थ्यावर उपचार करण्यात आलेले आहेत. तसेच कर्करोगाचे अंतिम निदान झालेल्या १,८३७ लाभार्थ्यांवर उपचार करण्यात आलेले आहेत.
(४) त्याच प्रमाणे मोहिमेच्या दुस-या टप्प्यामध्ये आत्तापर्यंत एकूण ५२,२९४ लाभार्थ्यांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया (Minor &; Major surgery ) करण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यात कोरोनाच्या कोणत्याही उपप्रकाराच्या प्रादुर्भाव होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजना**

**(४०) ५६६५३ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाचा उपप्रकार ओमायक्रॉन या विषाणूचे रुग्ण माहे डिसेंबर, २०२२ अखेर अथवा माहे जानेवारी, २०२३ च्या प्रारंभी निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या विषाणूने बाधित झालेले किती व कोणकोणत्या ठिकाणी रुग्ण आढळून आले आहेत,
(३) असल्यास, ह्या रुग्णांना शासनाच्या वतीने उपचारांबाबत कोणत्या प्रकाराची मदत करण्यात आली आहे ,
(४)असल्यास, राज्यात कोरोनाच्या कोणत्याही उपप्रकाराच्या आजाराचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाची प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.
ऑक्टोबर, २०२२ पासून राज्यात कोविड विषाणूचा उपप्रकार ओमायक्रॉन बाधित रुग्ण आढळून आले. तथापि, ज्या भागात हा नवा विषाणू दिसून आला त्या भागात विषाणूचा प्रसार वेगाने होताना दिसून आला नाही व रुग्णांमध्ये या आजाराची तीव्रता कमी असल्याचे निदर्शनास आले.
(२) डिसेंबर, २०२२ पर्यंत राज्यात ओमायक्रॉन चे २५८ रुग्ण आढळले आहेत. राज्यात मुंबई (११५), पुणे (९४), ठाणे (३८), कोल्हापूर (४), नागपूर, भंडारा - प्रत्येकी २, अकोला, अमरावती व रायगड - प्रत्येकी १ असे एकूण २५८ ओमायक्रॉन चे रुग्ण आढळले आहेत.
(३) अशा प्रकारचे रुग्ण आढळल्यास राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये योग्य ते उपचार करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) राज्यात ओमायक्रॉन व इतर सर्व व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर कोविड प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहे.
• आय.एल.आय. आणि सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
• रोगनिदानासाठी प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.
• रुग्णोपचारासाठी पुरेशी रुग्णालयीन व्यवस्था
• कोविड विषाणूच्या जनुकीय क्रमनिर्धारणासाठी राज्यात ९ प्रयोगशाळा कार्यरत.
• नवीन व्हेरियंट आढळलेल्या रुग्णांचा साथरोग शास्त्रीय अभ्यास आणि त्यानुसार कार्ययोजना.
• कोविड प्रतिबंधक लसीकरण.
• कोविड प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण आणि लोकप्रबोधन
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी रुग्णालयामध्ये सिझेरिअन पद्धतीने होत असलेले महिलांचे प्रसूतीचे प्रमाण कमी होणेबाबत**

**(४१) ५६७९८ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरकारी रुग्णालयापेक्षा खाजगी रुग्णालयामध्ये सिझेरिअन झालेल्या महिलांच्या प्रसूतींचे प्रमाण सन २०१७-१८ मध्ये २४ टक्के, सन २०१८-१९ मध्ये २७ टक्के, सन २०१९-२०, २०२१-२२ आणि माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत हे प्रमाण २६, ३१ आणि ३५ टक्के इतके नोंदविण्यात आल्या प्रकरणी कुटुंब कल्याण विभागाने चिंता व्यक्त केल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी रुग्णालये महिलांची प्रसूती करण्याकरिता अनावश्यक सिझेरिअन शस्त्रक्रिया लादून त्याचेकडून ५० हजार रुपये ते १ लाख रुपयापेक्षा अधिक वाढील बील आकारून सामान्य महिलांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी रुग्णालयामध्ये होणाऱ्या सिझेरिअनचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या सिझेरिअन प्रसुती संदर्भातील निकषानुसार आवश्यक मार्गदर्शक सुचनांच्या पालनाबाबत तसेच स्त्री रोग तज्ञांच्या संघटनेच्या सिझेरिअन शस्त्रक्रियेसाठी दिलेल्या नियमावलीचे पालन करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शिफारशी, मार्गदर्शक सूचना व निर्देशांचे सक्तीने पालन खाजगी रुग्णालयामध्ये करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०७-२०२३) :**(१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य संस्थेतील सिझेरियन प्रसूतीची टक्केवारी खालीलप्रमाणे:

| वर्ष | सार्वजनिक आरोग्य संस्थामध्ये सिझेरीअन प्रसुतीचे प्रमाण % | खाजगी आरोग्य संस्थामध्ये सिझेरीअन प्रसुतीचे प्रमाण% |
|---|---|---|
| २०१७-१८ | १७ | २४ |
| २०१८-१९ | २० | २७ |
| २०१९-२० | २१ | २६ |
| २०२१-२२ | २४ | ३१ |
| upto Oct २०२२ | २६ | ३२ |

(२) खाजगी रुग्णालयांकडून महिलांची अनावश्यक सिझेरिअन प्रसूती करण्याकरिता वाढीव बील आकारुन सामान्य महिलांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे प्रकार निदर्शनास आलेले नाही.

(३) खाजगी रुग्णालयामध्ये होणा-या सिझेरिअन प्रसूतीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. तथापि जागतिक आरोग्य संघटनेच्या सिझेरिअन प्रसूती संदर्भातील निकषानुसार आवश्यक मार्गदर्शक सुचनांच्या पालनाबाबत तसेच स्त्री रोग तज्ञांच्या संघटनेच्या सिझेरिअन शस्त्रकियेसाठी दिलेल्या नियमावलीचे पालन करण्यात येत नसल्याबाबत तक्रार निदर्शनास आलेली नाही.

(४) (१) खाजगी रुग्णालयामध्ये होणा-या सिझेरिअनचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी खाजगी स्त्रीरोग तज्ञांना FOGSI मार्फत Modified Robson's Criteria चा वापर करुन आवश्यकतेनुसार सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.
(२) राज्यात खाजगी व शासकीय रुग्णालयामध्ये सिझेरियनचे वाढते प्रमाण रोखण्याकरिता तज्ञांची समिती गठीत करण्यात आलेली होती. या समितीच्या शिफारसीनुसार Federation of Obstetric and Gynecological societies of India (FOGSI) यांच्यामार्फत खाजगी रुग्णालयांमध्ये होणाऱ्या सिझेरियनचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी त्यांच्या सर्व सदस्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातमध्ये आरोग्य उपकेंद्राचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) ५६८२४ (२८-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयामध्ये आरोग्य उपकेंद्राचे ५१ प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२३मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील ग्रामपंचायतीनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन प्रस्ताव दाखल केला असूनही सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.
सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोडबृहत आराखडया मध्ये रत्नागिरी जिल्हयामध्ये ०१ प्राथमिक आरोग्य केंद्र व ५१ उपकेंद्रे दि. १९.०३.२०२१ ( दि.२०.०५.२०२१ रोजी प्राप्त ) अन्वये परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला.
तथापि यापुर्वीचे सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोडबृहतआराखडा नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे निर्मितीचे १९ जिल्हयांकडून परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाले होते, सदर प्रस्ताव आयुक्तालय स्तरावर स्थापन छाननी समितीमार्फत तपासणी करुना दि. ११.०६.२०२१ च्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला होता. परतु दिनांक १९.०७.२०२१ च्या पत्रान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत बृहत आराखडाच्या प्रस्ताव सादर करतांना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला होता त्या सर्व बाबीचा अवलंब करून सन २०११ च्या लोकसंख्येनुसार बृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले.
सन २००१ चा बृहत आराखडा MRSAC या शासकीय संस्थेमार्फत सॅटेलाईट मॅपिंगव्दारे तयार करण्यात आला होता. त्यानुसार त्या संस्थेकडुन सन २०११ चा जोडबृहत आराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणुक करण्यात आली असुन आरोग्य संस्थाचे मॅपिंगचे काम पुर्ण झाले असुन प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. रत्नागिरी जिल्हयातील आरोग्य संस्थाचे मॅपिंग पूर्ण झाले असुन त्यांचे प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर राज्याचा एकत्रित जोडबृहतआराखडयामध्ये नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र निर्माण करण्यासाठी MRSAC या तांत्रिक संस्थेची मदत घेण्यात आली असून सद्यस्थितीत कार्यरत संस्थांचे मॅपिंग पुर्ण झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर (मॉड्युलर OT) सुरू करण्याबाबत

**(४३) ५७२२३ (२४-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर (मॉड्युलर OT) तातडीने सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान आयुक्त,आरोग्य सेवा , महाराष्ट्र राज्य, संचालक, राष्ट्रीय आरोग्यसेवा अभियान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवळपास तीन वर्षाचा कालावधी होऊनसुध्दा उपजिल्हा रूग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरिता लागणा-या साधनसामुग्री करिता निधी उपलब्ध होऊनसुध्दा अद्यापही ऑपरेशन थिएटर सुरू झाले नसल्यामुळे नागरिकांना आरोग्य सेवा मिळण्यास गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर (मॉड्युलर OT) तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे मॉड्युलर ओ.टी. तयार करणेसाठी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुसार जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांनी जी.एम.पोर्टलवर प्रक्रिया करुन मे.एन.एल.हेल्थ केअर, सोलापूर यांना आदेश दिले असून सद्यस्थितीत कामकाज प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा शासकीय रुग्णालय (जि.रत्नागिरी) येथील स्त्रीरोग तज्ज्ञ रजेवर असल्याने पर्यायी व्यवस्था करण्याबाबत

**(४४) ५७७२२ (२८-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शासकीय रुग्णालय (जि.रत्नागिरी) येथील स्त्रीरोग तज्ज्ञ आठवडाभरासाठी रजेवर गेल्यामुळे प्रसूती विभागात एकही डॉक्टर नसल्याने प्रसूतसाठी आलेल्या महिलांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात दरमहा २५० हून अधिक प्रसूती होत असूनही या विभागातील स्त्रीरोग तज्ज्ञ रजेवर गेले असता पर्यायी स्त्रीरोग तज्ज्ञ वा इतर वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्याकडे संबधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर रुग्णालयात भविष्यात असे प्रकार होऊ नयेत याकरीता कार्यवाही करणेसह याकडे दूर्लक्ष करण्या-या संबधित अधिकारी /कर्मचारी यांच्यावा कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरी येथील स्त्रीरोग तज्ज्ञ आठवडाभरासाठी रजेवर गेल्यामुळे जिल्हा रुग्णालय, रत्नागिरीच्या अधिपत्याखालील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयातील एकूण ३ स्त्रीरोग तज्ञ व राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत ऑनकॉल बेसीसवर एकूण ८ खाजगी स्त्रीरोग तज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असल्याने, रुग्णसेवेमध्ये कोणतीही गैरसोय झालेली नाही. तसेच माहे ऑक्टोबर, २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे ७४८ नॉर्मल डिलेव्हरी व ३३७ सिझेरियन शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) ५७७९१ (२८-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय इर्विन येथे वर्ग १ च्या वैद्यकीय अधिका-यांची एकुण २२ मंजूर पदापैकी ११ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी,२०२३ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या रुग्णालयातंर्गत जिल्हयात २२ रुग्णालये असून येथील वर्ग-२ च्या वैद्यकीय अधिका-यांची १९ पदे रिक्त असून वर्ग-३ च्या कर्मचा-यांची ६४२ मंजूर पदांपैकी १७५ पदे रिक्त तर वर्ग-४ च्या ३५४ पदांपैकी १२५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यास गैरसोयीचे होत असून येथील कर्मचारी व अधिका-यांवर कामाचा अतिरीक्त ताण येत आहे, हे ही खरे आहे काय ,

(४)असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित आरोग्य उपसंचालक, डॉक्टर व अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करुन रुग्णालय प्रशासनाने पदे भरण्यासंदर्भात शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदरहू पदे रिक्त असल्याने रुग्ण सेवेमध्ये कोणत्याही प्रकारची अडचणी निर्माण होऊ नये त्याकरीता सामान्य रुग्णालय, अमरावती यांचेमार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३ व त्यावरील ) मधील उपसंचालक, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ तसेच सामान्य राज्य सेवा या संवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २२१ उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त झाल्या असुन १८२ उमेदवारांना पदस्थापना देण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ या निवडसुचीवर्षात उपसंचालक, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रीया सुरु आहे.

जिल्हाधिकारी, यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत वै.अ. गट- अ (एस-२०) ची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी वैद्यकीय अधिकारीची पदे मुलाखतीद्वारे भरली जात आहेत. गट-क व गट-ड संवर्गातील पदभरती प्रक्रीयेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या आपतकालिन मार्गिके( इमरजेंसी कॉरिडोर) बाबत**

**(४६) ६०५३० (२८-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालयात गंभीर रुग्णांसाठी आपत्कालीन व कॅज्युअल्टी ला जोडण्यासाठी वैद्यकीय आपतकालिन मार्गिका (मेडिसीन इमरजेंनी कॅरिडोर) तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैद्यकीय आपतकालिन मार्गिका (मेडिसीन इमरजेंनी कॅरिडोर) कधीपर्यंत पूर्ण केली जाणार आहे,

(३) असल्यास, येथे कॅज्युअल्टीमध्ये रात्रीच्या वेळेस डॉक्टरांची कमतरता असल्याने त्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०२३) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर रुग्णालयात कॅज्युल्टीमध्ये पुरेसा प्रमाणात डॉक्टरांची ड्युटी लावण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यात क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी करावयाच्या उपाययाकजना**

**(४७) ६०८२६ (०२-०५-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात मागील एक वर्षात हजारो क्षयरुग्ण आढळुन आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये सन २०२२ (जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२) मध्ये १२५९ क्षयरुण आढळून आले.

(२) मा. प्रधानमंत्री यांच्या महत्वाकांक्षी धोरणानुसार क्षयरोग निर्मुलन सन २०२५ पर्यंत करावयाचे आहे. त्यानुषंगाने राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये क्षयरुग्ण शोधण्याकरीता सर्व पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहे. हिंगोली जिल्हयात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, हेल्थ अँड वेलनेस सेंटर्स मार्फत संशयीत क्षयरुग्णांची मोफत थुंकी तपासणी केली जाते. एक्सरे तपासणी केली जाते. या तपासणीत क्षयरोग आढळून आल्यास रुग्णास मोफत उपचार सुरु केले जातात. तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांनी क्षयरुग्णाचे निदान केले असल्यास मोफत उपचार देण्याची सोय आहे. तसेच क्षयरुग्णास दरमहा रु. ५००/- इतका पोषण आहार भत्ता दिला जातो. हिंगोली जिल्हयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा यांचेमार्फत वेळोवेळी सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिम Active Case Finding राबविण्यात येत असून जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधून मोफत उपचार केले जातात. सहसंचालक क्षयरोग, पुणे यांचे कार्यालयामार्फत हिंगोली जिल्हयात पाठविण्यात आलेल्या एक्सरे व्हॅन मार्फत हिंगोली जिल्हयात विशेष एक्सरे तपासणी मोहिम राबविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयाच्या विकासकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४८) ६११९० (२८-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयाचे काम निधीअभावी संथ गतीने होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यादरमयान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील अन्य विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर महाविद्यालयाला तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०२३) :**(१), (२) व (३) शासकीय दंत महाविद्यालयाचे काम व अन्य विकास कामे निधी अभावी प्रलंबित नाही. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरीता पुरेसा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील अंगणवाडया बांधकाम संदर्भात**

**(४९) ६१४७९ (२८-०४-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील महिला बालविकास विभागा मार्फत किती अंगणवाड्या चालवण्यात येतात ,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात एक हजाराहून जास्त अंगणवाड्या या खाजगी वास्तू मध्ये भरवण्यात येत असल्याने त्यांना जागा उपलब्ध करणे व इमारती बांधणे साठी जिल्हा परिषद, पुणे यांनी नियोजन केले आहे काय,,

(३) असल्यास, अंगणवाड्या बांधण्यासाठी जिल्हा परिषदे कडे किती प्रस्ताव दाखल व किती मंजूर असून प्रत्यक्षात किती ठिकाणी कामे सुरू करण्यात आले आहे,

(४) असल्यास, राज्यात अंगणवाड्याना स्वतंत्र वास्तू व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०७-२०२३) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण प्रकल्पामध्ये ४३८४ अंगणवाडी केंद्र चालविण्यात येतात.

(२) व (३) पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ४३८४ अंगणवाडी केंद्रांपैकी ३५४७ एवढया अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या शासकीय इमारती उपलब्ध आहेत. तसेच, ८३७ अंगणवाडी केंद्र सद्यस्थितीत खालील ठिकाणी भरविण्यात येतात:-

| भाडयाची खोली | मंदीर व समाज मंदीर | प्राथमिक शाळा | इतर ठिकाणी | ग्राम पंचायत | खाजगी |
|---|---|---|---|---|---|
| ८३ | ९५ | ३०६ | १२१ | ६८ | १६४ |

वरील ८३७ अंगणवाडी केंद्रापैकी ३०६ अंगणवाडया शाळेच्या खोल्यांमध्ये कायमस्वरुपी भरविण्यात येत आहेत. तसेच, जिल्हा परिषद पुणे मार्फत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये १४१ अंगणवाडी बांधकामे मंजूर

झालेली असून बांधकामांची कार्यवाही चालू आहे. तसेच, सन २०२१-२२ व त्यापूर्वी मंजूर असलेल्या १७५ अंगणवाडयांचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. त्यानुसार एकूण ३१६ अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारत उपलब्ध होणार आहे.

उर्वरित २१५ एवढया अंगणवाडी केंद्रांसाठी स्वतंत्र इमारतींची आवश्यकता असून त्यापैकी, १४२ अंगणवाडी केंद्र इमारत बाधंकामाचे प्रस्ताव सन २०२३-२४ साठी प्राप्त असून जिल्हा नियोजन समिती कडून प्रस्तावांना मान्यता प्राप्त झाल्यावर बांधकाम पूर्ण करण्यात येतील. तसेच, उर्वरित ७३ अंगणवाडी केंद्रांसाठी जागा उपलब्ध करणेसाठी ग्रामपंचायत यांचेकडे प्रयत्न करण्यात येत आहेत. जागा उपलब्ध झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेऊन अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यात येईल.

(४) व (५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.३१ जानेवारी, २०२२ अन्वये महिला व बाल विकास सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदर शासन निर्णयामध्ये अंगणवाडी केंद्रांचे नवीन बांधकाम करण्याचे प्रावधान आहे.

---

**रत्नागिरी जिल्हयातील देवरुख ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर तसेच कामथे येथील बाह्यरुग्ण विभागाची इमारतीचे संसरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन दुरुस्ती करणेबाबत**

**(५०) ६१८८८ (०२-०५-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथिल ग्रामीण रुग्णालयाची इमारत जुनी व अपुरी असल्याने त्याचे नुतनीकरणाचे काम सुरु आहे तथापि अपुऱ्या सोयीसुविधामुळे रुग्णांना रत्नागिरी, मुंबई, कोल्हापूर, मिरज या ठिकाणी उपचाराकरीता हलवावे लागत असल्याने परिणामी रुग्णांना मोठा आर्थिक भुर्दंड पडत आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, संगमेश्वर तालुक्यातून मुंबई–गोवा व कोल्हापूर-रत्नागिरी हे राष्ट्रीय महामार्ग जात असून तेथे होणाऱ्या अपघातावेळी रुग्णांना वेळेवर रत्नागिरी, डेरवण, कामथे येथे पोहविणे शक्य होत नसल्यामुळे नुतनीकरण होत असलेल्या देवरुख ग्रामीण रुग्णालयाचे सुसज्ज उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर होणे आवश्यक आहे. हे ही खरे आहे काय.

(३) तसेच, कामथे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागाची इमारत जीर्ण झाली असून इमारतीच्या बाहेरील बाजूस आतील सळया दिसून येत असून बाह्यरुग्ण विभागातील सर्व दारे, खिडक्या मोडकळीस आलेले असल्याने वेळीच दुरुस्ती न झाल्यास रुग्णांच्या उपचारात गैरसोय होऊ शकते परीणामी रुग्णांच्या जीवीतास धोका निर्माण होऊन गंभीर समस्या निर्माण होऊ शकते , हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदर बाह्यरुग्ण विभागाच्या इमारतीचे तातडीने संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करणेसंदर्भात मागणी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, देवरुख ग्रामीण रुणालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर तसेच कामथे येथिल बाह्यरुग्ण विभागाची इमारतीचे संसरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन दुरुस्ती करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०७-२०२३) :**(१) व (२) होय.

ग्रामीण रुग्णालयाच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, आवश्यकतेनुसार गंभीर रुग्णांना पुढील उपचाराकरीता जिल्हा रुग्णालय किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडे संदर्भित केले जाते.

स्थानिक प्रतिनिधी यांनी देवरुख येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांचेकडे दि. ६.२.२०२३ च्या पत्रान्वये केली आहे.

(३) व (४) होय

(५) बाह्यरुगण विभागाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन मिळणेकरीता उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळून यांना वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय कामथे यांनी दि. १८.१०.२०२२ अन्वये कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.